भारताचे ठोस उत्तर : तिसऱ्या दिवशी ४ बाद ३१९ धावा

पुजारा, विजयची शतके

राजकोट : चेतेश्वर पुजाराने घरच्या मैदानावर आकर्षक शतकी खेळी केली. मुरली विजयने देखील आक्रमक आणि बचावात्मक खेळाची झलक दाखवित शतक साजरे करताच भारताने पहिल्या कसोटीत पाहुण्या इंग्लंडला ठोस उत्तर दिले. पाहुण्यांच्या पहिल्या डावातील ५३७ धावांना उत्तर देत तिसऱ्या दिवसअखेर शुक्रवारी ४ बाद ३१९ पर्यंत दमदार मजल गाठली. अखेरच्या चार चेंडूत भारताने विजय आणि नाईट वॉचमन अमित मिश्रा (००)यांना गमावले.

पुजारा(१२४)आणि विजय(१२६) यांचा खेळ तिसऱ्या दिवसाचे आकर्षण ठरले. या दोघांनी दुसऱ्या गड्यासाठी २०९ धावांची भागीदारी केली. त्याआधी गौतम गंभीर(२९) हा सकाळच्या सत्रात बाद झाला. भारतीय संघ इंग्लंडच्या तुलनेत २१८ धावांनी मागे आहे. पुजाराने २०६ चेंडू टोलवित १७ चौकारांसह १२४ तर विजयने ३०१ चेंडूत नऊ चौकार आणि ४ षटकारांसह १२६ धावा ठोकल्या.

इंग्लंडच्या गोलंदाजांनी दुसऱ्या तसेच तिसऱ्या सत्रात शिस्तबद्ध मारा केला. विराट कोहलीला खाते उघडण्यासाठी संघर्ष करावा लागला. विजयदेखील पुजाराच्या तुलनेत मंदगतीने खेळला पण संधी मिळताच त्याने मोठे फटके मारले.

विजय कोहलीसोबत १७ षटके खेळपट्टीवर होता. पण दोघांनी केवळ १४ धावा काढल्या. खेळ संपायच्या काही मिनिटाआधी त्याचा संयम सुटला. आदील रशिदच्या गुगलीने त्याचा घात केला. मुरलीचा झेल हसीब अहमदने टिपला.

चेतेश्वर पुजारा

मुरली विजय

धावफलक

इंग्लंड पहिला डाव : ५३७. भारत पहिला डाव : मुरली विजय झे. हमीद गो. रशिद १२६, गौतम गंभीर पायचित गो. ब्रॉड २९, चेतेश्वर पुजारा झे. कूक गो. स्टोक्स १२४, विराट कोहली नाबाद २६, अमित मिश्रा झे. हमीद गो. अन्सारी ००, अवांतर: १४, एकूण: १०८.३ षटकांत ४ बाद ३१९ धावा. गडी गोलंदाजी : ब्रॉड २०-७-५४-३, व्होक्स २३-५-३९-०, मोईन अली २२-६-७०-०,अन्सारी १७.३-१-५७-१, रशिद १६-१-४७-१, स्टोक्स १०-१-३९-१.

लक्षवेधी...

- डीआरएसचा पहिला लाभ पुजाराला झाला. तो ८६ धावांवर असताना जफर अन्सारीच्या चेंडूवर पंच ख्रिस गेफेनी यांनी त्याला पायचित दिले. विजयसोबत चर्चा केल्यानंतर पुजाराने रेफ्रल मागितले. बॉल ट्रॅकिंग तंत्रामुळे चेंडू विकेटच्या वरुन जात असल्याचे दिसताच पुजारा नाबाद ठरला.
- डीआरएसच्या निर्णयामुळे जीवदान मिळताच पुजाराने चहापानानंतर नव्या चेंडूवर व्होक्सला एक धाव घेत स्वत:चे ९ वे आणि इंग्लंडविरुद्ध तिसरे शतक नोंदविले. स्टेडियममध्ये शतकाचा आनंद साजरा करणाऱ्यांत स्थानिक चाहत्यांशिवाय पुजाराचे वडील आणि पत्नी यांचा देखील समावेश होता.
- तिसऱ्या सत्रात पहिल्याच षटकात विजयला देखील रेफ्रलमधून जीवदान लाभले. त्याने मोईन अली आणि स्टुअर्ट ब्रॉड यांना षटकार खेचून सातवे शतक साजरे केले. १६ डावानंतर हे त्याचे पहिले आणि इंग्लंडविरुद्ध दुसरे शतक होते.
- विजय ६६ धावांवर असताना कव्हरला क्षेत्ररक्षण करणारा हसीब हमीद त्याचा झेल घेऊ शकला नाही.

लोकमत समूहातर्फे आयोजित ११ डिसेंबर रोजी होणाऱ्या 'लोकमत औरंगाबाद मॅरेथॉन'मध्ये आपला प्रवेश निश्चित करणारा ॲब्स जीमचा समूह. सोबत वसीम हाश्मी, कुणाल नारगुल्ला, जितेंद्र औताडे, आनंद त्रिमुखे, आनंद चाबूकस्वार, गगन सेठी, गौरव जेजुरीकर, मेहेर बिंद्रा, परमीत घई, नम्रता मालपाणी, सतीश खरात व शेख हबीब.

मुंबई शहरची परभणी संघावर दणदणीत मात

औरंगाबाद : महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेच्या मान्यतेने व जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या वतीने माजी आ. किशोर पाटील यांच्या अमृतमहोत्सवी वर्षानिमित्त कन्नड येथील कणकावतीनगर येथे राज्यस्तरीय कुमार, कुमारी कबड्डी स्पर्धेस प्रारंभ झाला.

सलामीच्या लढतीत मुंबई शहरने परभणी संघावर दणदणीत विजय मिळवला. मुंबई शहरच्या खेळाडूंसमोर परभणीचा संघ टिकाव धरू शकला नाही. मुंबई शहर संघाने हा सामना ९६ विरुद्ध १६ असा तब्बल ८० गुणांनी जिंकला. या स्पर्धेत महाराष्ट्रातून मुलांचे २५ आणि मुलींचे २२ असे एकूण ४७ संघ सहभागी झाले. स्पर्धेचे उद्घाटन आ. हर्षवर्धन जाधव यांच्या हस्ते झाले.

अध्यक्षस्थानी ज्ञानोबा मुंढे उपस्थित होते. याप्रसंगी राज्य कबड्डी संघटनेचे अध्यक्ष किशोर पाटील, कार्याध्यक्ष दत्ता पाथ्रीकर, सरकार्यवाह आस्वाद पाटील, तसेच जिल्हा कबड्डी संघटनेचे कार्याध्यक्ष विजय पाथ्रीकर, कार्यवाह बाबुराव अतकरे, मधू बक्षी, पुंडलिक शेजूळ, गणेश शेट्टी उपस्थित होते.

उद्घाटन सोहळ्यादरम्यान राष्ट्रीय खेळाडू सोनी जायभाये अणि महाराष्ट्राला कास्यपदक जिंकून देण्यात योगदान असणाऱ्या माणिक राठोड यांचा सत्कार करण्यात आला. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रसन्ना पाटील, प्राचार्य डॉ. हिंमत नरके, देवाडीकर, वामन चव्हाण, प्रवीण शिंदे, स. अजगर पटेल, संजय संसारे, म्हात्रे, मनोज ठाकूर, सिद्धार्थ पाटील आदी परिश्रम घेत आहेत.

हेरिटेज मॅरेथॉननिमित्त २६ रोजी मिल्खासिंग औरंगाबादेत

औरंगाबाद : २७ नोव्हेंबर रोजी औरंगाबाद ब्लॅक बक्सतर्फे औरंगाबाद येथे दौलताबाद किल्ला ते वेरूळ लेणी या मार्गावर अर्धमॅरेथॉन आयोजित करण्यात आली आहे. या मॅरेथॉननिमित्त २६ नोव्हेंबर रोजी एमआयटी महाविद्यालयात होणाऱ्या प्रदर्शनाच्या उद्घाटनास 'फ्लाइंग सिक्ख' मिल्खा सिंग औरंगादेत येणार आहेत. हे प्रदर्शन सायंकाळी ५ वाजेपर्यंत सगळ्यांसाठी खुले असणार आहे. २७ नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धेचा मार्ग हा दौलताबाद किल्ला ते वेरूळ लेणी आहे. ही मॅरेथॉन १० कि.मी., २१ कि.मी. आणि २५ कि.मी. अशा अंतराची होणार आहे. या मॅरेथॉनमध्ये देशभरातून जवळपास ३,000 धावक सहभागी होणार आहे. या मॅरेथॉनसठी गेल्या सहा महिन्यांपासून स्पर्धेची तयारी करण्यात येत आहे. एबीबीतर्फे प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारी विद्यापीठ परिसरात 'लास्ट सण्डे ऑफ द मन्थ रन'चे आयोजन केले जाते. शहरात धावण्याची संस्कृती रुजावी, युवा पिढीने धावण्याकडे वळावे, स्थानिक धावपटूंना भारतातील तज्ज्ञ मॅरेथॉन धावपटूंकडून मार्गदर्शन मिळावे या हे उद्देशाने कार्यशाळांचे आयोजन केले.

'साई' केंद्रात अद्ययावत स्विमिंगपूलला मान्यता

लवकरच होणार सुरुवात : १० कोटी ३० लाखांचे बजेट, ऑलिम्पिक आकारांचा सुविधांनी युक्त असणार जलतरण तलाव

जयंत कुलकर्णी ● औरंगाबाद

वीरेंद्र भांडारकर ('साई'चे उपसंचालक)

विद्यापीठ परिसरातील 'साई'च्या पश्चिम विभागीय केंद्रात अद्ययावत स्विमिंगपूल होणार याविषयी चर्चा होती; परंतु आता मात्र खऱ्या अर्थाने भारतातील पहिल्या अद्ययावत ठरणाऱ्या स्विमिंगपूल उभारणीस लवकरच सुरुवात होणार असल्याची माहिती 'साई'चे पश्चिम विभागीय केंद्राचे उपसंचालक वीरेंद्र भांडारकर यांनी 'लोकमत'शी बोलताना दिली.



दिल्ली येथे ४ नोव्हेंबर रोजी नुकतीच बैठक झाली होती. या बैठकीत भांडारकर यांनी स्विमिंगपूलचे प्रेझेंटेशन दिले होते.

या बैठकीतच स्विमिंगपूलला भारतीय क्रीडा प्राधिकरणचे महासंचालक इंजेटी श्रीनिवास यांनी मान्यता दिली. हा स्विमिंगपूल सिमेंटचा असावा, की स्टीलचा याविषयी विचार करण्यात आला. सिमेंटच्या उभारलेल्या स्विमिंगपूलला तडे जाण्याचे आणि भूकंप झाल्यास त्याचे नुकसान होण्याची जास्त शक्यता आहे.

त्यामुळे हा स्विमिंगपूल स्टीलमध्ये उभारण्यात येणार आहे आणि अशा प्रकारचा अद्ययावत स्विमिंगपूल भारतातील पहिलाच ठरेल, असा विश्वासही वीरेंद्र भांडारकर यांनी व्यक्त केला.

- या स्विमिंगपूलचा एकंदरीत परिसर हा ४०६०.00 स्क्वेअर मीटर असणार आहे.
- तसेच मुख्य स्विमिंगपूल २५ मीटर बाय ५० मीटरचा असणार आहे. याची खोली १२५०.00 स्क्वेअर मीटर असणार आहे.
- त्याचप्रमाणे या जलतरण तलावात २७३ व्यक्तींची बसण्यासाठी गॅलरी असणार आहे. त्याचप्रमाणे या जलतरण तलावात अद्ययावत अशा सुविधा असणार आहेत.
- या स्विमिंगपूलमध्ये मल्टीपर्पज हॉल, जलतरणपटूंसाठी जीम, प्रशिक्षकांसाठी ऑफिस, फिल्ट्रेशन रुम असणार आहे.
- हा जलरण तलाव या भागातील हवामानाशी जुळवून घेणारा असणारा आहे. १० कोटी ३० लाख रुपयांचा हा प्रोजेक्ट असणार आहे. सहा महिन्यांत हा अद्ययावत जलतरण तलाव उभारला जाईल, असा विश्वासही वीरेंद्र भांडारकर यांनी व्यक्त केला.

मनोरंजक शब्दकोडे ५७७

आडवे शब्द १) सुखरुप निपुण, ५) दाटीवाटीने, ७) चपळ, ९) दिवाळखोर, १०) सापाने टाकलेली त्वचा, १२) तक्रार, १३) एकावेळी, १५) वृद्धी, १६) थंड, १८) खंदक, १९) नाटकाचा एक भाग, २१) कापसाचे बी, २३) बूड, २४) मांडणी; आकृतिबंध, २६) लाकडी फळ्यांचे जलवाहन, ३०) प्राण, ३१) आटोपशीर, ३२) लाकूड चिरण्याचे हत्यार.

उभे शब्द १) वितुष्ट, २) तारांबळ, ३) तीर, ४) निर्लज्ज, ५) पिकाचे टॉनिक, ६) एक मिठाई, ८) किळस; अस्वल, ११) स्वच्छ, १४) प्रत्येक, १५) गोधडी, १७) जीभ, १९) आकाश, २०) कन्या, २२) अंतर, २५) घेरी, २७) कमळ, २८) आशिया खंडातील एक देश, २९) नेमका.

(उत्तर : पुढील अंकात)

मागील शब्दकोड्याचे उत्तर

चि	रं	जी	व	■	सं	ग	त	■	जा
र	■	व	र	पां	गी	■	ल	ग	त
मि	श	न	■	ग	त	ध	वा	■	मु
री	प	■	आ	ळा	■	मा	र	■	च
■	थ	प्प	ड	■	का	का	■	पा	ल
द	■	■	प	त्रा	स	■	ग	ल	का
ग	ड	ब	ड	■	व	र	दा	न	■
द	■	द	दा	त	■	ज	■	■	धा
ग	झ	ल	■	प	र्व	त	शि	ख	र

राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेचे उद्घाटन करताना मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया, सोबत क्रीडा उपसंचालक राजकुमार माहादावाड, हॉकी महाराष्ट्रचे उपाध्यक्ष पंकज भारसाखळे, जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे.

अर्जेंटिना सहाव्या स्थानी; वर्ल्डकप प्रवेश धोक्यात

साओ पाउलो : विश्वचषक फुटबॉल पात्रता फेरीत ब्राझीलने अर्जेंटिनाच्या विश्वचषकात पोहोचण्याच्या आशांना मोठा धक्का दिला आहे. १० संघांच्या दक्षिण अमेरिकी पात्रता फेरीत ब्राझीलने अर्जेंटिनावर ३-०ने विजय मिळविला. यामुळे या गटात अर्जेंटिना सहाव्या क्रमांकावर आहे.

ब्राझीलच्या फिलीप कोटिन्हो आणि नेमार यांनी पहिल्या हाफमध्ये दोन गोल केले, तर पोलिन्होने ५८व्या मिनिटाला तिसरा गोल केला. अर्जेंटिनाचा हा चौथा पराभव आहे. यासोबत ब्राझील ११ सामन्यांत २४ गुणांसह अग्रस्थानी आहे, तर अर्जेंटिना १६ गुणांसह सहाव्या स्थानी आहे.

परिपाठ

शरीर पाण्यामुळे, मन सत्यामुळे व आत्मा ज्ञानामुळे पवित्र राहतो.

वचनामृत

थोडे वाचणे पण अधिक विचार करणे, थोडे बोलणे आणि अधिक ऐकणे हाच बुद्धिमान बनण्याचा उपाय आहे. अशा बुद्धिमान व्यक्ती जेव्हा नम्र असतात तेव्हा त्या महानतेच्या निकट पोहोचतात.

- रवींद्रनाथ टागोर

पंचांग

शनिवार, दि. १२ नोव्हेंबर २०१६

- भारतीय सौर २० कार्तिक १९३८
- मिती कार्तिक शुद्ध त्रयोदशी २७ क. २ मि.
- रेवती नक्षत्रे २२ क. ३० मि.
- मीन चंद्र २२ क. ३० मि.
- सूर्योदय ६ क. ४६ मि., सूर्यास्त ६ क. 00 मि.
- शनी प्रदोष

दिनविशेष


डॉ. सालीम अली

१८४२ । अरगॉन या निष्क्रिय वायूचा शोध लावल्याबद्दल १९०४ चे नोबेल पारितोषिक मिळविणाऱ्या जॉन रॅले या शास्त्रज्ञाचा जन्म.

१८८0 । सशस्त्र क्रांतिकारक, समाजसेवक, तत्त्वचिंतक सेनापती बापट यांचा जन्म.

१८९६ । आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पक्षितज्ज्ञ डॉ. सालीम अली यांचा जन्म.

१९0४ । ज्येष्ठ समाजवादी नेते एस. एम. जोशी यांचा जन्म.

१९४६ । बनारस हिंदू विद्यापीठाचे निर्माते पं. मदन मोहन मालवीय यांचे निधन.

१९५२ । 'युनेस्को'च्या अध्यक्षपदी सर्वपल्ली राधाकृष्णन यांची निवड.

२00५ । ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, माजी मंत्री मधू दंडवते यांचे निधन.

आज जन्मलेली मुलं :

२२ क. ३० मि. पर्यंत जन्मलेली मुलं मीन राशीत असतील. त्यानंतर मेष राशीत मुलांचा प्रवेश होईल. सात्त्विक विचार आणि जिद्दी प्रवृत्ती असे ग्रह प्रतिसाद देत आहे. प्रसंग आणि कार्ये यांच्या समन्वयातून सफलता सोपी होईल. शिक्षणात शुभ.

- अरविंद पंचाक्षरी

शुभाशुभ चौघडी

दिवसाचे प्रत्येक दीड तासाप्रमाणे आठ विभाग आणि रात्रीचे आठ विभाग असे चौघडी प्रमाण असून, पुढे सकाळी ६ प्रमाण धरुन आजच्या चौघडी दिलेल्या आहेत. आपल्या शहराचा सूर्योदय-सूर्यास्त बघून या चौघडीचा उपयोग करावयाचा आहे. प्रारंभ सहाऐवजी सूर्योदयापासून पुढे करावा.

दिवसा- सकाळी ६ ते ७.३0 काल, ७.३0 ते ९ शुभ, ९ ते १0.३0 रोग, १0.३0 ते १२ उद्वेग, १२ ते १.३0 चंचल, १.३0 ते ३ लाभ, ३ ते ४.३0 अमृत, ४.३0 ते ६ काल.

रात्री - ६ ते ७.३0 लाभ, ७.३0 ते ९ उद्वेग, ९ ते १0.३0 शुभ, १0.३0 ते १२ अमृत, १२ ते १.३0 चंचल, १.३0 ते ३ रोग, ३ ते ४.३0 काल, ४.३0 ते ६ लाभ.

राशिभविष्य

- **मेष-** काही प्रसंगात निष्कारण कुचंबणा निर्माण होईल.
- **वृषभ-** नवीन साधन झटपट यश मिळवून देतील.
- **मिथुन-** कला, क्रीडा प्रांतात प्रभाव निर्माण होईल.
- **कर्क-** आर्थिक प्रगतीचा दिवस, प्रवास होतील.
- **सिंह-** आरोग्य आणि खर्च स्वास्थ्य दूषित करतील.
- **कन्या-** मार्गी लागणारी प्रकरणे रेंगाळत ठेवू नका.
- **तूळ-** आरोग्य सांभाळा, घाईगर्दीत निर्णय नको.
- **वृश्चिक-** लाभ होतील, कार्यभाग साधेल, प्रवास होईल.
- **धनु-** निर्धाराने पुढे चालत राहा, मार्ग सापडतील.
- **मकर-** शुभवार्ता समजतील, आप्तांच्या भेटी.
- **कुंभ-** हाती असलेली कार्ये पूर्ण करता येतील.
- **मीन-** उलाढालीतील उत्साह यश मिळवून देईल.

राज्यस्तरीय हॉकी स्पर्धेत औरंगाबादची विजयी घोडदौड

औरंगाबाद : जिल्हा क्रीडा कार्यालयातर्फे आयोजित राज्यस्तरीय शालेय हॉकी स्पर्धेत औरंगाबादच्या १४ वर्षांखालील मुली आणि मुलींच्या संघाने उपांत्य फेरीत धडक मारली.

मुलांच्या गटात औरंगाबादने लातूर संघावर २-0 गोलने मात केली. विजयी गोल रोहित वडमारे व विशाल वडमारे यांनी केला.

मुलींच्या गटात औरंगाबादने क्रीडा प्रबोधिनीवर ५-0 असा दणदणीत विजय मिळवला. औरंगाबादतर्फे उत्कर्षा काळेने ३ गोल केले. गौरी भुकणे आणि मनश्री शेळके यांनी प्रत्येकी १ गोल केला. अन्य लढतीत मुलांच्या गटात कोल्हापूरने अमरावतीचा ३-0, पुणे संघाने मुलींच्या गटात अमरावती संघावर ७-0 असा दणदणीत विजय मिळवला. पुणे संघाकडून पूजा गोगावकरने ४ गोल केले. श्रद्धा मनोरे, प्रीती कोळी आणि अमृता यांनी प्रत्येकी १ गोल केला. कोल्हापूर संघाने लातूर संघावर ८-0 गोलने मात केली. विजयी संघाकडून पूनम माने हिने ३, सानिका पवारने २ आणि सानिका नागरेने ३ गोल केले. तत्पूर्वी, स्पर्धेचे उद्घाटन मनपा आयुक्त ओम प्रकाश बकोरिया यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी क्रीडा उपसंचालक राजकुमार माहादावाड, हॉकी महाराष्ट्रचे उपाध्यक्ष पंकज भारसाखळे, जिल्हा क्रीडा अधिकारी ऊर्मिला मोराळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

व्ही. आर. रघुनाथकडे भारतीय संघाचे नेतृत्व

बंगलोर : आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफी हॉकी स्पर्धेत भारतीय सीनियर पुरुष संघाच्या यशानंतर २३ नोव्हेंबरपासून चार देशांचा सहभाग असलेल्या स्पर्धेसाठी संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर जाणार आहे. संघाचे नेतृत्व ड्रॅग फ्लिकर व्ही. आर. रघुनाथ करेल.

भारतीय संघ ऑस्ट्रेलिया दौऱ्यात चार देशांचा सहभाग असलेल्या स्पर्धेत खेळेल. त्यानंतर यजमान ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी मालिका खेळली जाईल. नियमित कर्णधार आणि गोलकिपर पी. आर. श्रीजेश हा गुडघ्याच्या जखमेमुळे संघाबाहेर असल्याने रघुनाथकडे कर्णधारपद सोपविण्यात आले. श्रीजेशला आशियाई चॅम्पियन्स ट्रॉफीच्या कोरियाविरुद्ध उपांत्य सामन्यादरम्यान जखम झाली होती.

संघाच्या उपकर्णधारपदाची जबाबदारी बचाव फळीतील खेळाडू आणि ड्रॅग फ्लिकर रुपिंदरपालसिंग याच्याकडे असेल.

भारतीय हॉकी संघ :गोलकिपर आकाश चिकटे, अभिनव कुमार पांडे.

बचाव फळी : रुपिंदरपालसिंग (उपकर्णधार), प्रदीप मोर, व्ही.आर. रघुनाथ (कर्णधार), वीरेंद्र लाक्रा, कोथाजितसिंग आणि सुरेंद्र कुमार. मधली फळी: चिंगलेनसानासिंग, मनप्रीतसिंग, सरदारसिंग, एस. के. उथप्पा. आक्रमक फळी: तलविंदरसिंग, निकिन तिमय्या, अफान यूसुफ, मोहम्मद आमिर खान, सतबीरसिंग आणि आकाशदीपसिंग.